CMYK

दैनिक आरंभ मराठी

■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 206 ■ वर्ष 2 रे ■ रविवार, दि. 7 सप्टेंबर 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# ढोल-ताशाच्या निनादात बाप्पांना निरोप

## श्री विसर्जन मिरवणुका थाटात, पारंपरिक पद्धतीने मंडळांचे सादरीकरण






छायाचित्र:गजानन तोडकर,कळंब

आरंभ मराठी | धाराशिव

दहा दिवसांच्या भक्तीमय गणेशोत्सवानंतर शनिवारी धाराशिव जिल्ह्यातील गणेश विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने पार पडला. शहरासह ग्रामीण भागात सकाळपासूनच मिरवणुकांची सुरुवात झाली. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, या गजरात वातावरण भारून गेले होते. ढोल-ताशांचा दणदणाट, झांज-मृदुंगाची लय, गुलालाच्या उधळणीने रस्ते लालबुंद झाले. नागरिकांच्या गर्दीने शहरातील प्रमुख मार्ग गजबजून गेले होते.



छायाचित्रः आरिफ शेख,धाराशिव





धाराशिव शहरातील प्रमुख मंडळांनी सजवलेल्या वाहनातून बाप्पांची मिरवणूक निघाली. काही मंडळांनी पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे देखावे उभे केले, तर काहींनी व्यसनमुक्ती, जलसंधारण आणि महिला सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित केले. तरुणाईने ढोल-ताशांच्या तालावर थिरकत नाच केला. महिला व मुलींनी पारंपरिक लेझीम पथकांमधून उत्साह वाढवला. अनेक कुटुंबांनी घरगुती बाप्पांना सजवून थाटामाटात निरोप दिला.मिरवणुका ठरलेल्या म ार्गांवरून शिस्तबद्ध पद्धतीने पुढे सरकत होत्या. सायंकाळपर्यंत संपूर्ण शहरभर ढोलांचा आवाज घुमत राहिला. काही मंडळांची मिरवणूक उशिरा रात्रीपर्यंत पोहोचली. तरीही नागरिकांनी संयमाने व भक्तिभावाने उत्सवाचा आनंद घेतला.

### समाजप्रबोधनाची परंपरा कायम

गेल्या दहा दिवसांत जिल्ह्यातील अनेक मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवून बांधिलकी जपली. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा असे विधायक उपक्रम पार पडले. काही मंडळांनी तर वर्षभर सातत्याने असे कार्यक्रम राबवण्याची परंपरा जपली आहे. यंदाही या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### सौहार्दाचा संदेश

विशेष म्हणजे, धार्मिक सौहार्द टिकवण्यासाठी मुस्लिम बांधवांनी आपला ईद-ए-मिलादचा जुलूस स्वयंस्फूर्तीने ८ सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलला. या निर्णयाचे प्रशासनाने स्वागत केले असून, यामुळे दोन्ही सण शांततेत पार पडले. नागरिकांमधील परस्पर आदरभावनेचे हे उत्तम उदाहरण ठरले.

### पोलिसांचा तगडा बंदोबस्त

गणेश विसर्जन आणि ईद-ए-मिलाद हे दोन मोठे सण एकाच दिवशी आल्याने पोलिस प्रशासनाने सुरक्षेचे काटेकोर नियोजन केले होते. जिल्हा पोलिस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर फौजफाटा तैनात करण्यात आला.१२३ पोलीस अधिकारी, १,५६६ पोलीस कर्मचारी, ७७० गृहरक्षक दलाचे जवान, एसआरपीएफचे एक प्लाटून, दंगल नियंत्रणाची दोन पथके आणि जलद प्रतिसादाची तीन पथके जिल्हाभरात सज्ज होती. प्रमुख मार्गांवर नाकेबंदी, सीसीटीव्ही नजर, तसेच दंगल नियंत्रण पथकांनी सतत गस्त ठेवली. संभाव्य गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रणासाठी शेकडो संशयितांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ नुसार जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आले होते.

### हातलादेवी तलावावर विसर्जन

धाराशिव शहरातील गणेश विसर्जन हे नगर पालिकेच्या समता नगर येथील विसर्जन विहिरीत आणि बार्शी रोडवरील हातलादेवी तलावावर करण्यात आले. विसर्जन करण्यासाठी तसेच विसर्जनावेळी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी स्वतंत्र नियोजन केले होते. रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पाणीपुरवठा व आरोग्य विभागाची टीम सज्ज ठेवण्यात आली होती. ग्रामीण भागात देखील नदीकाठ व तलाव परिसरात पोहणारे जलरक्षक, बोटी व आपत्कालीन यंत्रणा सततकार्यरतहोती.

आरंभ मराठी **नगर परिषदेचे उत्तम नियोजन, शिवसेवा तालीम गणेश मंडळाचा सेवाभावी उपक्रम**

# कळंब शहरात गणेश विसर्जन उत्साहात

गजानन तोडकर | आरंभ मराठी

कळंबः शहरात दहा दिवस चाललेल्या गणेशोत्सवानंतर रविवारी गणपती बाप्पांचे विसर्जन अत्यंत उत्साहात, पण सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सकाळपासूनच मिरवणुकींची रेलचेल सुरू झाली होती. ढोल-ताशांचे गजरात गणपती बाप्पा मोरयाच्या अखंड जयघोषामुळे संपूर्ण कळंब शहर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेले.

नगर परिषद कळंबने विसर्जनासाठी यंदा विशेष नियोजन केले होते. नदीकाठी भाविकांच्या सोयीसाठी कृत्रिम टाक्यांची उभारणी करण्यात आली होती. मोठ्या व उंच मूर्तींच्या विसर्जनासाठी क्रेनची सोय उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय प्रकाशयोजना, तसेच विसर्जनानंतर लगेच स्वच्छतेसाठी पथके तैनात करण्यात आली होती. नगर परिषदेचे कर्मचारी दिवसभर विसर्जनस्थळी कार्यरत होते. वाहतुकीसाठी पोलीस यंत्रणेने चोख बंदोबस्त केला होता, त्यामुळे कोणताही गोंधळ अथवा अपघात टळला.

### शिवसेवा तालीम संघाच्या सेवाभावी उपक्रम

शिवाजी कापसे यांच्या नेत्त्वाखाली शिवसेवा तालीम संघाच्या कार्यकर्त्यांनी यंदाच्या विसर्जन मिरवणुकीत सेवाभावी उपक्रम राबवला. मिरवणुकीत सहभागी झालेल्या ढोल-ताशा पथकातील कलाकार, भाविक तसेच दिवसरात्र कर्तव्य बजावणारे पोलीस व नगर परिषदेचे कर्मचारी यांच्यासाठी अल्पोपहाराची (नाश्ता-जेवणाची) व्यवस्था करण्यात आली. पिण्याच्या पाण्याचे वाटप करूनही भाविकांची तहान भागविण्यात आली.सामाजिक बांधिलकीतून केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



### बाप्पांना निरोप

रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या विसर्जन मिरवणुकीचा शेवट भक्तिगीतांच्या सुरावटीत आणि गणपती बाप्पा मोरया  पुढच्या वर्षी लवकर याच्या उत्स्फूर्त आरोळ्यांमध्ये झाला. दहा दिवस आनंदोत्सवाचा सोहळा अनुभवून अखेर कळंब शहरातील भाविकांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला.

# मोटारसायकलसह मुद्देमाल चोरणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या

आरंभ मराठी | धाराशिव


धाराशिव जिल्ह्यासह शेजारच्या जिल्ह्यातून मोटारसायकलसह इतर मुद्देम ाल चोरणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यात शनिवारी (दि.६) स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. पकडलेले दोघेही धाराशिव तालुक्यातील वरुडा येथील अट्टल चोर असून, त्यांना पकडल्यामुळे धाराशिव शहर व परिसरातील अनेक चोरीच्या घटनांची उकल होण्याची शक्यता आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्ञपवार यांच्या आदेशाने गुन्हे शाखेचे एक पथक चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी पथकाला गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, सिद्राम पोपट पवार व रमेश राजाभाऊ पवार (रा. वरूडा, पारधी पिढी) या दोन अट्टल चोरट्यानी मोटारसायकली, केबल वायर व खापरी पेंडीचे पोते चोरून त्यांच्या घराच्या बाजूला असलेल्या शेडमध्ये ठेवले आहेत. अशी माहिती मिळाल्याने पथकाने मिळालेल्या ठिकाणी जावुन आरोपीचा शोध घेतला असता ते पोलिसांना पाहून पळू लागले. त्यावेळी पोलिसांच्या पथकाने शिताफीने दोघांनाही ताब्यात घेतले. त्यांच्या घराच्या आजुबाजुची पाहणी केली असता, बाजुस असलेल्या शेडमध्ये लावलेल्या मोटारसाकली, केबल वायर व खापरी पेंडीचे पोते मिळुन आले. त्याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी या मोटारसायकली धाराशिव, भुम, सोलापुर, बीड, केज येथून चोरल्याचे सांगितले. तसेच केबल वायर, खापरी पेंडीचे पोते हे धाराशिव येथील दुकानातुन व वरूडा रोडवरून जाणाऱ्या ट्रकमधून चोरल्याचे कबूल केले.।या चोरीमध्ये त्यांचा आणखी एक सहकारी असल्याचे त्यांनी सांगितले. त्या सर्व मोटारसायकलीची अधिक माहिती घेतली असता, त्या मोटार सायकल आनंदनगर पोलीस स्टेशन, भूम, पोस्टे केज, पोस्टे फौ. चावडी सोलापुर व पोस्टे बीड ग्रामीण येथे चोरी झाल्याचे गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. पोलीस पथकाने दोन पंचाना बोलावुन ५ चोरीच्या मोटार सायकली व केबल वायर, खापरी पेंडीचे पोते असा २,०५,४८३ रू.चा मुददेम ाल जप्त करून आरोपींना आनंदनगर पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कामगिरी सपोनि सचिन खटके, सपोनि अमोल मोरे, पोह/ विनोद जानराव, अमोल निंबाळकर, नितीन जाधवर, मपोह/ शोभा बांगर, पोना / बबन जाधवर, चापोह/महेबुब अरब, विनायक दहिहंडे, प्रकाश बोईनवाड यांच्या पथकाने केली.

CMYK

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संपादकीय
रविवार, दि. 7 सप्टेंबर 2025

# जागतिक साहित्यकृतीचा ओघवता अनुवाद

**जगप्रसिद्ध** तत्त्वचिंतक,निसर्गवेत्ता,अभिजात साहित्यिक म्हणून ज्यांची ख्याती आहे अशा हेन्री डेव्हिड थोरोंचा मोठा प्रभाव राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावरही होता.थोरोंचे 'वॉल्डनकाठी विचारविहार' हे पुस्तक सर्वांच्या परिचयाचे आहे त्यामानाने केपकॉड हे त्यांचे प्रवासवर्णनपर पुस्तक अनेकांना माहित नसते.अशाच या केपकॉड चा ओघवत्या मराठी भाषेत अनुवाद ज्येष्ठ मराठी लेखक,अनुवादक भगवंत क्षीरसागर यांनी केला आहे.त्यामुळे अर्थातच मराठीमध्ये एका उत्तम साहित्यिककृतीची भर पडली आहे. मूळात स्वतः थोरो हे विचक्षण वाचक होते,अफाट वाचनामुळेच त्यांच्यातला थोर तत्त्वचिंतक घडत गेला असल्याचे निरिक्षण क्षीरसागर यांनी नोंदवले आहे.केपकॉड या एका साहित्यकृतीचा निव्वळ अनुवाद न करता क्षीरसागर सरांनी थोरोंची समग्र साहित्यसंपदा अभ्यासल्याचे पदोपदी जाणवते.मराठी वाचकांना थोरोची महती पहिल्यांदा दुर्गा भागवतांनी सांगितली.बरेचसे थोरोवाङ्मय त्यांनी मायमराठीत अनुवादीत केले आहे.थोरोंच्या विचारांची समीक्षा मागील दोनशे वर्षांपासून जगभरात सुरु असल्याचे सांगतानाच निसर्गाकडे पाहाण्याची एक आगळीवेगळी दृष्टीच त्यांनी प्रदान केल्याचेही प्रस्तावनेत नमूद केलेय. पृथ्वीला पर्यावरण ऱ्हासाच्या महासंकटापासून वाचवायचे असेल तर थोरो यांचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अंगिकारल्याशिवाय जगापुढे दूसरा पर्याय नाही,याचा उहापोह या पुस्तकाच्या प्रस्तावनेत करण्यात आला आहे. थोरोंची थोरवी सांगणारे हे पुस्तक नव्यापिढीने आवर्जून वाचण्यासारखेच आहे.त्यातून निसर्ग आणि पर्यावरणरक्षणाचे धडे सहजपणे गिरवता येऊ शकतील.थोरोंची बौद्धिक जडणघडण कशी होत गेली,निसर्गाकडे त्यांचा ओढा कसा वाढत गेला,जगभरात थोरो यांचे विचार कसे मान्यता पावले याचा विस्तृत आढावा प्रस्तुत प्रस्तावनेत येतो.त्यामुळे केपकॉड चा थेट




अनुवाद वाचण्याआधी वाचकांना थोरोंचे व्यक्तीमत्व आकळण्यास मदत होते.'सविनय कायदेभंग' या निबंधामुळे थोरो श्रेष्ठ राजकीय विचारवंत ठरले,या अभिनव अहिंसावादी शस्त्राचा चपखल वापर महात्मा गांधींनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात




ब्रिटिशसत्तेविरुद्ध झुंजताना केला आणि त्यात ते यशस्वीही ठरले.जगभरातील अहिंसावादी राजकीय कार्यकर्ते आणि नेत्यांना थोरोंमुळेच हे अमोघ अस्त्र उपलब्ध झाले.वॉल्डनमुळे थोरो यांना जागतिक किर्तीच्या श्रेष्ठ लेखकांमध्ये स्थान मिळाले,आदिम मानवांप्रमाणे अतिशय कमीतकमी साधनांमध्ये जीवन व्यतीत करण्याचा मूलमंत्र वॉल्डनमधून मिळतो.गांधीजींनीही थोरोंकडून यासंबंधीची प्रेरणा घेतली होती.माणूस आणि निसर्ग कसे परस्परपूरक आहेत,मानवाने निसर्गाभिमुख होणे कशी काळाची गरज आहे याची चर्चा दोनशे वर्षांपूर्वीच थोरोंसारखा द्रष्टा लेखक,तत्त्वज्ञ करीत होता.प्राचीन काळापासून भारतातील आणि जगभरातील आदिवासी समाज हेच तर सांगत आलेत,पण त्यांना समजून घेण्यात तथाकथित प्रगत समाज कमी पडला.या उलट जगभर स्थानिक मूळनिवासी जनतेला नष्ट करण्याचा, त्यांची संस्कृती मिटवण्याचाच उद्योग उघडपणे झालाय,अजूनही सुरुयं.या पार्श्वभूमीवर थोरोंचे साहित्य जगाच्या डोळ्यात अंजन घालणारेच ठरते.पण नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड विनाश करण्यालाच विकास व प्रगती मानणाऱ्या अधाशी प्रवृत्तींना आवर घालायचा कसा? हाच आजचा सर्वात मोठा प्रश्न बनला आहे.अशाकाळात थोरो आणि त्यांचे निसर्गपूरक विचार संपूर्ण जगाला विनाशापासून वाचविण्यासाठी मार्गदर्शक ठरु शकतात.म्हणूनच केपकॉड या साहित्यकृतीच्या मराठी अनुवादाचे आगळेवेगळे महत्व आहे. केपकॉड हे भूशिर निखळ वाळूचं आहे.तीनशे फूटांपर्यंत नुसती वाळू तर काही किनारेही वाळूचे.अशा या भूप्रदेशात थोरोंनी चार–पाचवेळा पायपीट केलेली,त्या भटकंतीवरचेच हे केपकॉड पुस्तक आहे.निसर्ग जसा अनुभवला अगदी तसाच तो थोरोंनी आपल्या वाचकांपुढे मांडला.निसर्गवाचनाचे तपशीलवार वर्णन करणारी थोरोशैली वाचकांना मंत्रमुग्ध करते,मुळात आपल्यासोबत थोरो आपल्या वाचकांनाही घेऊन जातात असेही म्हणता येईल.समुद्रकिनाऱ्यावरची जैवविविधता असो अथवा तिथले मानवीजीवन यांविषयी या पुस्तकात समरसून लिहिलेय,मराठी अनुवादाच्या माध्यमातून ते भगवंत क्षीरसागर यांनी वाचकांपर्यंत जसेच्या तसे पोहोचवले आहे.मराठीत हे पुस्तक वाचताना हे परकीय भाषेतले पुस्तक असल्याचे जराही जाणवत नाही इतका हा अनुवाद देशी झालाय,याचे श्रेय अनुवाद कौशल्याला द्यावे लागते.समुद्राची अफाट ओढ आणि समुद्रापल्याडचेजगमाणसाला प्राचीनकाळापासूनच खुणावत आले आहे.आपण समुद्राकाठी कसे फिरलो,राहिलो याचे साद्यंत वर्णन केपकॉडमधून येते.समुद्रकिनाऱ्यावरची ही प्रदीर्घ मुशाफिरी थोरोंनी स्थानिक इंडियन सोबत्यांच्या मदतीने केली होती.पृथ्वीवरची कितीतरी ठिकाणं मानवजातीला अद्यापही अज्ञात आहेत.मनुष्य आपल्या उण्यापूऱ्या आयुष्यात किती आणि काय काय फिरु–पाहू शकतो?थोरोंसारखे निसर्गावर निस्सिम प्रेम करणारे तत्त्ववेत्ते दुर्मिळच.पृथ्वीवरचा सर्वाधिक भाग हा समुद्राने व्यापला आहे.समुद्राच्या पोटात काय काय दडलंय यापासून आपण अजूनही अनभिज्ञच आहोत.समुद्राच्यातळाशी किती आणि काय काय बुडलेय,याचीही माहिती नाही.आपण या सागर किनारी काय काय केले,नैसर्गिक अडचणींचा कसा सामना केला याविषयी थोरो अतिशय मनस्वीपणे आपल्या पुस्तकात लिहितात,जे वाचकांना गुंगवून ठेवते.थोरोंना दैनंदिनी लिहिण्याची सवय होती,त्यामुळेच अशा श्रेष्ठतम साहित्यकृती जन्माला येऊ शकल्या.या स्वैर भटकंतीत स्थानिक रहिवाशांचे राहणीमान,जीवनमान याबद्दल चांगली माहिती मिळते.निसर्गवाचनाचे धडे कसे गिरवावेत हेही थोरो आपल्याला सांगून जातात.ही अथक पायपीट करताना आपले कान–डोळे कायम उघडे ठेवून जे जे दिसले ते ते टीपकागदासारखे लेखकाने टिपले आहे. माशांचे असंख्य प्रकार,प्राण्यांच्या कैक जाती,त्यांचा स्थानिकांशी असलेला संबंध या आणि अशा अनेक बाबींवर थोरो अभ्यासपूर्ण टिपणी करतात.जाता जाता त्यांची खास वैशिष्ट्ये सांगायलाही ते विसरत नाहीत. त्यातून नवनवीन माहिती उपलब्ध होते. निसर्गातला लहानमोठा असा प्रत्येक घटक हा पर्यावरणासाठी अतिशय महत्त्वाचा ठरत असतो,त्यामुळे निसर्गसाखळीला खीळ बसणार नाही याची काळजी घेतच मानवाने आपला वावर ठेवला पाहिजे,आपण माणसे निसर्गाचाच एक छोटासा भाग आहोत याची जाणीव सातत्याने ठेवली पाहिजे याचे शिक्षण आणि भानच थोरो आपल्या समग्र मांडणीमधून वाचकांना देत असतात.दोनशे वर्षांपूर्वी अपूऱ्या साधनांनिशी केलेली ही समुद्राकाठची भ्रमंती म्हणजे एखाद्या दर्यावर्दीने केलेल्या अफाट पराक्रमाच्याच तोडीचा म्हटला पाहिजे.ज्यामधून मानवाच्या पुढच्या पिढ्या नक्कीच प्रेरणा घेत राहिल्यात.थोरोंचं अवघं आयुष्यच निसर्गाला समर्पित केलेलं होतं. आधुनिकजीवनशैलीलाचटावलेलेआपणनिसर्गाची हाक,साद धुडकातो,आणि अफाट आनंदालाच मुकतो.प्रत्येक व्यक्तीच्या मनात खोल कुठेतरी एक निसर्गप्रेमी दडलेला असतो,थोरोंसारखा निसर्गवेत्ता जेव्हा आपला मुक्तभटकंतीचा अनुभवकोश आपल्या पुढे उलगडतो,तेव्हा आपसूकच निसर्गाची साद गहिरी होत जाते.'केपकॉड अर्थात एका भूशिरावरील परिभ्रमण' या पुस्तकामधूनही त्याच पृथ्वीच्या हाका आपल्या कानावरनिनादताना पानोपानी जाणवतात,याचे श्रेय जितके थोरोंच्या निसर्गमग्न लेखनशैलीला तितकेच ते मायमराठीत जसेच्यातसे पोहोचवणाऱ्या अनुवाद तपश्चर्येलाही.



भरत यादव
yadavbh515@gmail.com
9890140500

पुस्तकाचे नावः
केपकॉड–एका भूशिरावरील परिभ्रमण
लेखकः हेन्री डेव्हिड थोरो
अनुवादः भगवंत क्षीरसागर
प्रकाशकःवर्णमुद्रा पब्लिशर्स
पृष्ठसंख्याः १५४ किंमतः ३६४ रुपये

# राग अन् भीक माग!


**''राग** अन् भीक माग''! अशी एक म्हण आपल्यात फार पूर्वीपासून आहे. जुने जाणते वाडवडील म्हणत असत हे अगदी सत्य आहे. अलिकडील काळात ज्या घटना घडताना दिसत आहेत. मागील पिढी म्हणजे आपले आजोबा,वडील यांच्या काळात अशा घटना क्वचित घडत असत. तेव्हा कोणताही टोकाचा प्रसंग आला तर सर्व समंजस पणे सोडवत होते. परंतू अलिकडे ज्या घटना घडताना दिसत आहेत त्याचे एकमेव कारण म्हणजे रागावर नियंत्रण नसणे.हे आहे. खून करणे,मारहाण करणे,गाडी अंगावर घालणे,कुटूंब संपवणे,फाशी घेणे किंवा देणे अशा घटना फक्त रागाच्या भरात होत आहेत.याचा अर्थ अलिकडील माणसाचा सहनशीलता किंवा रागावर नियंत्रण राहिले नाही. हा एक ज्वलंत आणि गंभीर प्रश्न बनला आहे. अनेकदा मैत्रीच्या संवादातून सहज बोलताना किंवा थट्टा मस्करी करताना राग अनावर होऊन वाईट घटना घडताना पाहतो.म्हणजे चालू काळात समाजातील माणसे स्वतःच्या रागावर ,स्वतःवर ताबा ,नियंत्रण, सहनशीलता राहिली नाही. असे प्रकार का घडतात ? याचा विचार प्रत्येकाने आत्मचिंतन करणे गरजेचे आहे.राग ही एक मनाची नकारात्मक अवस्था आहे.जे इच्छेविरुद्ध घडते आणि स्विकारता येत नाही,तेव्हाच रागाचा उगम होतो. संयमी ,संशयी, आनंदी वृत्तीचा अभाव असणाऱ्या व्यक्ति ,चुकीचा विचार, शीघ्र कोपी,आणि कल्पना यात गुरफटलेल्या व्यक्तिला राग लवकर येतो. राग ही एक मनाची अशी एक अवस्था आहे.ती प्रत्येक व्यक्तीमध्ये आढळते.मनाविरुद्ध घडणाऱ्या बाह्य घटनेला मनाने दिलेली ती एक नकारात्मक अशी तीव्र स्वरूपाची प्रतिक्रिया होय.असे तज्ञांनी सांगितले आहे.यावर जो मात करेल तो खरा आनंदी व्यक्ती आहे. अलिकडील काळात समाजात घडणाऱ्या घटना पाहता अपयश येणे,ध्येय प्राप्तिच्या मार्गातील अडथळा, नैराश्य, वैफल्य, संशय,भीती यावर मात करण्यासाठी आपल्या मनाने ती उभारलेली एक प्रतिकार यंत्रणा असते.काही रागीट व्यक्तीमध्ये राग,पश्चातापाची भावना,नैराश्य, व्यसनांचा आधार आणि पुन्हा राग येऊन इतरांना किंवा स्वतःला ईजा पोहचवण्याची उर्मी अशी मालिका दिसून येते. म्हणजेच अनियंत्रित राग कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात दुष्परिणाम घडवून आणतो.समाजात अशा अनेक घटना रागाच्या भरात घडताना आपण पाहतो.किरकोळ कारणावरून खून,बलात्कार विनयभंग, मारहाण अशी अनेक प्रकरणे माणूस रागावर नियंत्रण नसल्यामुळेच ओढवून घेताना दिसतो. त्यासाठी संयम राखणे फार गरजेचे आहे.कश्या प्रकारे आपण आपले अनमोल जीवन उद्ध्वस्त करत आहेत. त्यासाठी संयमाने विचारपूर्वक परिस्तिथी हाताळणे गरजेचे आहे.रागाच्या भरात हातून चुकीने एखादी अघटीत प्रकार घडला तर त्याचासर्व कुटूंब, सगेसोयरे यांच्यावर काय परिणाम होईल याचा ही विचार करणे अवश्यक आहे.रागावर नियंत्रण ठेवणे ज्या व्यक्तिला जमते तो जीवनात यशस्वी होतो.याची अनेक उदाहरणे आहेत. त्यासाठी प्रत्येकाने समंजसपणे प्रसंग हाताळणे किंवा संयमाने , संवादाने प्रश्न सोडवणे.यातून जो मार्ग काढेल तोच यशस्वी व सुखमय जीवन व्यतीत करेल.यासाठी कोणताही विपरीत प्रसंग येत असेल तर त्याचा अगोदर गांभीर्याने विचार करून त्यावर सविस्तर चर्चा करणे अपेक्षित आहे.शेवटी '' राग अन् भीक माग '' हे अगदीच सत्य आहे.



सोमनाथ बेलुरे
धाराशिव
९८५००३६६४६

# पारतंत्र्याचे कारण

**छत्रपती** शिवाजी महाराजांनी भारतात परकीय आक्रमक अफगाणी तुर्की इराणी सिद्दी मोगल , पोर्तुगीज डच फ्रेंच इंग्रज इत्यादी समुद्रमार्गे आले होते याचा बारकाईने अभ्यास केला होता . व्यापारी म्हणून आलेले हे सर्वच पुढील काळात टप्प्या टप्प्याने स्थानिक सहकार्याने राज्यकर्ते झाले. तर आपण गुलाम झालो. पुढे इंग्रजांनी संपूर्ण भारतभर सत्ता स्थापन केली.यासाठी इंग्रजांच्या शक्ती ऐवजी आमच्या मधील अंतर्गत फितुरी , मानपान , गैरसमज , बंद फितुरी वा सत्तासंघर्ष जास्त प्रमाणात कारणीभूत आहे .. असे लक्षात येत.छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार उभे करुन समुद्रावर सत्ता स्थापन केली . मराठा आरमार एक नंबरचे मानले जात होते . सर्वच परकीय सत्ता वर वचक निर्माण झाला होता . पुढे सरखेल कान्होजी आंग्रे यांनी कोकणातील सर्वच बंदरात आरमार उभे केले होते . छत्रपती शाहू महाराज सातारा यांच्या मृत्यूनंतर (१७४९ ) मराठ्यांच्या गादीला पावरफूल तरुण वयाचा वारस मिळाला नाही . परिणामी दत्तक आलेले बाल छत्रपती पेशव्यांच्या हातातील बाहुले झाले होते .. हीच परंपरा चालू राहिली.याचा गैरवापर करून पेशवेच पावरफूल होऊन छत्रपतींचे सर्वच अधिकार वापरु लागले होते . पेशव्यांनी सर्वप्रथम जे जे मराठा सरदार छत्रपतींशी एकनिष्ठ होते त्यांचा काटा काढायचा कार्यक्रम राबविला . त्यांच्यात आपसात बेबनाव निर्माण होईल असे गैरसमज पसरवले . पाटील देशमुख सरदार इनामदार यांच्या कडून येणारे पैसे छत्रपती कडे भरणा न करता स्वत:कडेच ठेवले . छत्रपती दैनंदिन जीवनातील खर्चासाठी पेशव्यावर अवलंबून राहू लागले. या विरोधात गायकवाड , दाभाडे , आंग्रे असे काही निष्ठावान सरदार उभे राहिले . त्यांना कुटनितीने संपवण्यात पेशवे यशस्वी झाले . परंतू आंग्रेंनी विरोध केला.आणि शेवटी पेशव्यांनी इंग्रजी फौजा व आरमाराची मदत घेऊन मराठा आरमार बुडवले . आंग्रे हारले . समुद्राच्या किनाऱ्यावर इंग्रजांनी सत्ता स्थापन केली. आणि पुढील काळात इंग्रजांनी पेशव्यांना त्यांची जागा दाखवून बेईमानीचे फळ दिले १८१८ मध्ये मराठेशाही संपली व इंग्रजांची सत्ता स्थापन झाली.यासाठी इंग्रजांची ताकद कारणीभूत नाही . तर दुर्बल छत्रपती व फितूर पेशवे जबाबदार आहेत. मराठा आरमार बुडवले नसते तर भारतात इंग्रजी सत्ता कधीच आली नसती . एवढे आरमाराचे महत्व आहे.म्हणून म्हणतात,मराठा मेला तर कोण जगेल? मराठा जगला तर कोण मरेल? जय जिजाऊ ....



पुरुषोत्तम खेडेकर
चिखली .
संस्थापक अध्यक्ष
मराठा सेवा संघ.
मो.९१९८२३६९३२२७ .

# दहा वर्षाचा मुलगा हृदयविकाराने जातो..

**मानवी** जीवन क्षणभंगुर आहे.कधी कोणाचे काय होईल हे सांगता येत आहे.हे मोठ्या माणसांच्या बाबतीत ठीक आहे. कारण मोठ्या माणसांची बदलती जीवनशैली,कामाचा ताणतणाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि चिंता, जेवणाच्या अवेळा, व्यायामाचा अभाव अशा अनेक कारणांमुळे माणसांना अनेक प्रकारच्या व्याधी जडतात.यात कालांतराने माणसे दगावतात. तर कधी तीव्र झटक्याने माणसे मृत्यूला सामोरे जातात. खरं प्रत्येकाला निरोगी आणि आनंदी आरोग्य मिळायला हवं. त्यासाठी प्रयत्न करायला हवेत.वर्तमानात आनंदी जगण्यापेक्षा माणसं भविष्याच्या चिंतेने वर्तमान दुःखी करतात.आपल्या आरोग्याची काळजी घेणं आपल्या हातात आहे.नुकतीच कोल्हापूरची घडलेली दुदैवी अत्यंत वेदनादायी आहे.दहा वर्षाच्या शाळकरी मुलाला हृदयविकाराचा झटका येतो आणि त्याचा अंत होतो.मनाला चटका लावून जाणारी आणि समस्त पालक वर्गाच्या चिंतेत भर घालणारी ही घटना आहे.लहान मुले जर हृदयविकाराने बळी पडणार असतील तर आता पालक वर्गाला सावध होण्याची गरज आहे. मुलांच्या जीवनशैली विषयी नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.ज्यांच्या हाती उद्याच्या भारताचे भविष्य आहे अशा या बालकांना जपणं, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणं,त्यांना तणावमुक्त आनंदी जगण्यासाठी वातावरण देणं हे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. मुलांना पुरेशी झोप मिळेल याची काळजी घ्यावी.रात्रीचे टिव्ही पाहणे, मोबाईल बघणे टाळावे.



मुलांच्या आहारात पालेभाज्या, फळभाज्या,कडधान्ये तसेच शरीरास आवश्यक जीवनसत्त्वे मिळणारा आहार द्यावा.मुलांना सकाळ अथवा संध्याकाळी मैदानांवर खेळण्यासाठी वेळ द्यावा.जेणेकरुन त्यांच्या शरीराचा चांगला व्यायाम होईल.बाहेरचे खाद्यपदार्थ खाण्याचे टाळावे.घरी बनवलेले अन्न द्यावे.पाकीटबंद पदार्थ खाण्यास देऊ नयेत.त्याचा मुलांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो.डब्यात बाहेरील खाद्यपदार्थ देणे टाळावे.घरी तयार केलेले अन्नपदार्थ डब्यात द्यावेत.मुलांना आहारात रोज एका तरी फळाचा समावेश करावा.दिवसभरात शरीराला आवश्यक तेवढे पाणी पिण्याची सवय लावावी. मुलांची नियमितपणे आरोग्य तपासणी करावी. गरज असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मुलांचा आहार सात्विक, पौष्टिक कसा राहिल याकडे लक्ष द्यावे.मुलांशी संवाद साधावा. त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात.मुले नेहमी आनंदी कशी राहतील याकडे लक्ष द्यावे.

लक्ष्मण जगताप
बारामती

# धाराशिव प्रशालेत शिक्षक दिन उत्साहात




आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव प्रशालेत भारताचे माजी राष्ट्रपती व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसानिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उपस्थितांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शाळेचे मुख्याध्यापक पंडित जाधव मार्गदर्शन करताना म्हणाले की, आईनंतर शिक्षक हा खरा गुरु असून, त्यांच्या मार्गदर्शनातूनच आपले व्यक्तिमत्व घडत असते. शिक्षण, समाजकारण आणि राजकारण या सर्वच क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करून डॉ. राधाकृष्णन यांनी विद्यार्थ्यांना व समाजाला शिस्त लावण्याचे कार्य केले. त्यांची क्षमाशील वृत्ती आणि विचारसरणी आजही प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नंदकुमार रणदिवे होते. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. राधाकृष्णन यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, भारताचे दुसरे राष्ट्रपती असूनही त्यांनी आपली ओळख शिक्षक म्हणूनच जपली. त्यामुळेच त्यांच्या जन्मदिवशी शिक्षक दिन साजरा केला जातो. हा दिवस विद्यार्थ्यांच्या प्रेमाचा आणि शिक्षकांच्या कृतज्ञतेचा प्रतीक आहे.यावेळी जयश्री भोसले, चंद्रकांत माळी, सुवर्णा सोनवणे, दिपाली रोकडे, गौरी माने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन. चंद्रकांत माळी यांनी तर आभार प्रदर्शन दिपाली रोकडे यांनी केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
रविवार, दि. 7 सप्टेंबर 2025

# मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल: आ. कैलास पाटील यांचे प्रतिपादन

## १८ मुलींनी सिरत उन स्पर्धेत मिळवले १०० पैकी १०० गुण

आरंभ मराठी | कळंब

ईद ए मिलाद निमित्त आझाद ग्रुप आणि आगाज फाउंडेशनच्या वतीने आयोजित स्पर्धेचे बक्षीस वितरण आणि राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा शुक्रवारी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमास आमदार कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा, कृ.उ. बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, मुख्तारबेग मिर्झा, पोलीस निरीक्षक अजित चिंतले, उपनिरीक्षक पठाण, राजेंद्र मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मौलाना याहया कासमी, मुफ्ती फारुख, हाफिज आरेफ, हाफिज खालेद, मौलाना सादिक, मौलाना शोएब आणि मौलाना युन्नूस यांनी कुराण पठण केले. यावर्षी झालेल्या सिरत उन नबी प्रश्नोत्तर स्पर्धेत तब्बल ४२९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी 'ए' गटातील तब्बल २४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष यश संपादन केले. यामध्ये १८ मुलींचा समावेश असून मुलींचा लक्षणीय सहभाग कौतुकास्पद ठरला. या सर्व विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी आमदार कैलास पाटील म्हणाले की, ''आजच्या स्पर्धात्मक युगात मुस्लिम समाजाने मुलींच्या शिक्षणावर भर द्यावा. घरातील मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब प्रगतीकडे वाटचाल करते. पैगंबर मोहम्मद यांच्या विचारांचे आचरण करून अशा उपक्रमांचे दरवर्षी आयोजन झाले पाहिजे.'' तर माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा यांनी कळंब




### यांनी मिळवले १०० पैकी १०० गुण

शगुफ्ता मणियार, अरमान सौदागर, फायजा शेख, आमान शेख, हुमेरा मोमीन, अनस मणियार, उम्मे अयमन मणियार, उम्मे कुलसुम कुरेशी, मिसबा शेख, उमर सय्यद, उम्मे हानी मणियार, रोशनी मणियार, अलविरा जावेद, अरीज शेख, मुस्तकीम बागवान, अरमिश सय्यद, जैनब शेख, माहीन पठाण, मुब्बसिरा मणियार, शफिया मणियार, आहाना शेख, फातिमा सय्यद, मदिहा मणियार, सबाहत मणियार. बी ग्रुपमध्ये प्रथम तनजीला सय्यद, द्वितीय सोबिया मिर्झा तृतीय क्रमांक सुफीया पठाण यांनी पटकावले.

शहरातील सामाजिक एकात्मतेसाठी कार्य करणारे स्व. सलिमभाई मिर्झा यांचे योगदान अधोरेखित केले. पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. यावर्षीपासून आगाज फाउंडेशनतर्फे दिला जाणारा ''सलिमभाई मिर्झा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार'' ॲडव्होकेट अल्ताफहुसेन काझी यांना मुख्तारबेग मिर्झा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला पालक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डिकसळचे उपसरपंच सचिन काळे, माजी सरपंच अमजद मुल्ला, मिनहाज शेख, इस्माईल हन्नूरे, रुकसाना बागवान, परवेज काझी, कुणाल मस्के, विश्वजित जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आझाद ग्रुपचे मोहसीन मिर्झा, उमरान मिर्झा, समीर मिर्झा, उमान मिर्झा व अन्य सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुस्तान मिर्झा यांनी केले.

## तालुकास्तरीय पावसाळी शालेय क्रिकेट स्पर्धेत मुलांच्या संघाने पटकावला प्रथम क्रमांक



आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (ता.४) तालुकास्तरीय पावसाळी शालेय क्रिकेट स्पर्धेत १९ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने यावेळी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जयचंद्र जाधव होते. यावेळी क्रीडाशिक्षक एम. डी. काळे, प्रा. बी. टी .जाधव, दत्तात्रय जाधव, प्रा. परमेश्वर सूर्यवंशी, नागनाथ तेलंग, प्रा. यु. पी. कांबळे, प्रा. दत्तात्रय राठोड, जे.डी. बुवा आदींची उपस्थिती होती. संघातील खेळाडू निखिल रणखांब, संदीप राठोड, विश्वजीत जाधव, दत्ता बिराजदार, आरपात शेख, कृष्णा रणखांब, गोपाळ बुंदगे, शिवाजी बुंदगे, प्रतिक बिराजदार, इरफान शेख, रितेश कोराळे, अनुराग दंडगुले, राज कांबळे, सिध्दार्थ गायकवाड, समर्थ पुजारी, दिपक चव्हाण आदींचा सत्कार करण्यात आला. प्रा. जाधव, प्रा. परमेश्वर सूर्यवंशी, काळे यांची भाषणे झाली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन एस. टी. गायकवाड यांनी तर आभार सतीश कांबळे यांनी मानले. प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्ञान प्रसार विद्यालयात शिक्षक दिन वक्तृत्व स्पर्धेने साजरा

आरंभ मराठी | मोहा



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने कळंब तालुक्यातील मोहा येथील ज्ञान प्रसार माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि.०५ रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.शिक्षक दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक तथा प्राचार्य अविनाश मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी रमेश मोहेकर, पर्यवेक्षक सतीश कानगुडे, उच्च माध्यमिक विभागाचे प्रा. सुनील साबळे, ज्येष्ठ सहशिक्षक डी. बी. मडके, प्रा. विठ्ठल जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. वक्तृत्व स्पर्धेच्या सुरुवातीला आठवीच्या मुलींनी स्वागतगीत सादर केले. अंजली मडके, वसुंधरा वीर, वैष्णवी मडके, दीक्षा कसबे, आदिती मडके, सानिका बाराखोते यांनी या गीतामध्ये सहभाग घेतला. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदररीत्या आपले विचार मांडले. यात प्रियंका जाधव, सानिका बाराखोते, आदिती मडके, अंजली मडके, वैष्णवी मडके, प्रतीक्षा कोष्टी, अंजली कोष्टी, दीक्षा कसबे व वसुंधरा वीर यांनी सहभाग घेतला. सहशिक्षिका नीता सोनवणे यांनी आपल्या मनोगतातून सर्व वक्त्यांचे कौतुक केले.शिक्षक दिनानिमित्त विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिकांचा विद्यार्थिनींकडून गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. चंद्रशेखर गिरी यांनी केले तर सूत्रसंचालन अंकिता झोरी हिने केले. शेवटी उपस्थितांचे आभार श्रुती माळी हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षिका नीता सोनवणे, प्रा. प्रतिभा सावंत, सहशिक्षक सतीश मडके, प्रा. रोहित मोहेकर, प्रा. दिग्विजय पाटील, प्रा. देवदत्त पाटील, प्रा. अमित जाधव, प्रा. राहुल भिसे, अमितकुमार शर्मा, अनूप पाटील, बी. एम. काळे, दिगंबर शिंदे, ज्ञानोबा टोपे, प्रथमेश साडेकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

## भाई उद्धवराव पाटील प्रशालेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती उत्साहात



आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील भाई उद्धवराव पाटील प्रशालेत भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. एस. टी. गंगावणे मॅडम उपस्थित होत्या, तर प्रशालेचे मुख्याध्यापक अमोल घोगरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व भाई बळवंत (बप्पा) घोगरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. मुख्याध्यापक घोगरे यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक दीपस्तंभ असून विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतो. शिक्षक केवळ ज्ञान देत नाही तर विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची जडणघडण करतो. विद्यार्थ्यांच्या मनात प्रामाणिकपणा, शिस्त, मेहनत आणि संस्कार रुजवण्याचे पवित्र कार्य शिक्षक करतात. म्हणूनच राष्ट्रनिर्मितीमध्ये शिक्षकांचा सहभाग सर्वात मोलाचा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञतेची भावना बाळगून त्यांच्या शिकवणीला आयुष्यात उतरवणे हेच खरे गुरुंप्रतीचे अभिवादन होय असे बहुमूल्य मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रताप माळी यांनी केले व आभार अशोक मुंढे यांनी मानले.

## श्रीकृष्ण गणेश मंडळाची आरती महिलांच्या हस्ते; खेळ पैठणी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव श्रीकृष्ण गणेश मंडळ, गवळी वाडा, धाराशिव यांच्या वतीने महिलांसाठी खेळ पैठणी स्पर्धा आणि श्रींची आरती महिलांच्या हस्ते करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. मंडळाची स्थापना १९९२ मध्ये झाली असून तेव्हापासून मंडळ वेगळेपण जपत विधायक उपक्रम राबवत आहे. यावर्षी 'ऑपरेशन सिंदुर' हा भारतीय सैन्याच्या शौर्याचे दर्शन घडवणारा देखावा सादर करण्यात आला आहे. नारीशक्तीचा सन्मान करण्याच्या हेतूने द्वारकादास शामकुमार व मंडळाच्या संयुक्त विद्यमाने खेळ पैठणीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात सुमारे १५० महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. मनोरंजनात्मक खेळांच्या स्पर्धांनंतर विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात आली. त्यात प्रथम क्रमांक प्रणिता वाघ ( ₹ ३०००), द्वितीय मीनाक्षी पाटील (₹ २०००) व तृतीय सुषमा पाटील ( ₹ १०००) यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच उत्तेजनार्थ पाच विशेष बक्षिसेही देण्यात आली. स्पर्धेत सहभागी प्रत्येक महिलेला द्वारकादास शामकुमार यांच्यातर्फे ₹ १०० रोख प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व महिलांना श्रींच्या आरतीचा मान मिळाला. मान्यवरांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष शितल देशमुख, उपाध्यक्ष अभिषेक बागल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुरेश गवळी यांनी केले.

## मुरुममध्ये ईद ए मिलादुन्नबी उत्साहात; ऑटो रिक्षा संघटनेतर्फे शरबत वाटप उपक्रम



**मुरुम :–** शहरात ईद ए मिलादुन्नबी सणानिमित्त धार्मिक सौहार्द व सामाजिक एकतेचे दर्शन घडले. शहरातील ऑटो रिक्षा संघटनेतर्फे शुक्रवारी (ता. ५) रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य शरबत वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पैगंबरांच्या शिकवणीप्रमाणे बंधुभाव, एकता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन केले.शहरातील नागरिक, ऑटो रिक्षाचालक, व्यापारी व प्रवाश्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शरबत वाटपाचा लाभ घेताना नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते. या वेळी संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांमध्ये अब्दुल शेख, शाहरुख पटेल, बबलू सय्यद, महेबुब शेख, राहिल सय्यद, दाउल सय्यद, सैफन मदारसे, निसार शेख, दत्ता अबुसे, चाँद शेख, एजाज शेख, इम्रान सय्यद, सैफन शेख, अशोक बनसोडे, अयान शेख आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. धर्मीय सौहार्द, बंधुभाव व सामाजिक एकतेचे प्रतीक ठरलेला हा उपक्रम नागरिकांच्या लक्षात राहील असा यशस्वीरीत्या पार पडला.

## वादविवाद स्पर्धेतील आजचे विद्यार्थी म्हणजे भविष्यातील वक्ते

### ॲड.शीतल चव्हाण यांचे मत

आरंभ मराठी | उमरगा

ॲड.शीतल चव्हाण फाउंडेशन व जिल्हा परिषद हायस्कूल यांच्या वतीने आयोजित प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वादविवाद स्पर्धेला उमरगा तालुक्यातून मोठा प्रतिसाद मिळाला. आजच्या शिक्षण व्यवस्थेतून मानवी मूल्ये रुजत आहेत/नाहीत, हा या वादविवाद स्पर्धेचा विषय होता. या वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन उमरगा तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी अमोल राजपूत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून स्पर्धेचे आयोजक ॲड. शीतल चव्हाण, प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे, स्पर्धेचे परीक्षक राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक कमलाकर भोसले गुरूजी, प्रा. डॉ. पसरकल्ले गुरूजी, शीतल जावळे उपस्थित होत्या.यावेळी बोलताना ॲड. शीतल चव्हाण म्हणाले की, वादविवाद स्पर्धेतून भविष्यातील मोठे वक्ते तयार होतात. अनेक विद्यार्थ्यांना आज मोबाईल व डान्स सोडले तर चित्रकला, संगीत व वक्तृत्व अशा स्पर्धेमध्ये रुची राहिलेली नाही. पण अशा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पाहिजे. कारण, विद्यार्थी दशेमध्ये जर विद्यार्थी स्टेजवर येऊन आपले विचार ठामपणे मांडत असतील तर ते भविष्यातील मोठे वक्ते होऊ शकतात, तसेच विविध क्षेत्रात यश मिळवू शकतात. यावेळी गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत यांनी विद्यार्थ्याला मार्गदर्शन केले. स्पर्धेत तालुक्यातील एकूण १३ शाळेच्या संघांनी, म्हणजेच एकून २६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यात महात्मा गांधी विद्यालय, केसर जवळगा शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. त्या संघाला २१०० रुपयाचे रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह देण्यात आले. द्वितीय क्रमांक भारत विद्यालय, उमरगा या शाळेने पटकावला. या शाळेला १५०० रुपयाचे रोख बक्षीस व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. तर तृतीय क्रमांक पटकावलेल्या उमरग्याच्या जिल्हा परिषद हायस्कूलला ११०० रुपयाचे रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील धनराज तेलंग, विद्यानंद सुत्रावे, बशीर शेख, सदानंद कुंभार, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील, शिल्पा चंदनशिवे तर ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनचे सत्यनारायण जाधव, व्यंकट भालेराव, किशोर बसुगुंडे, प्रदीप मोरे, प्रदीप चौधरी, ॲड. अर्चनाताई जाधव यानी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरिता उपासे, प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे व आभार शिल्पा चंदनशिवे यांनी मांडले. कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आरंभ मराठी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचा अभिनव उपक्रम

# शिक्षक दिनानिमित्त ४५० शिक्षकांचा सत्कार



आरंभ मराठी | कळंब

शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या गुरुजनांचा सत्कार दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी मार्फत करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून दरवर्षी हा अभिनव उपक्रम रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी मार्फत घेतला जातो. शिक्षकांना गुलाब पुष्प आणि पेन देऊन त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. रोटरी अध्यक्ष डॉ.अभिजीत जाधवर, रोटरी सचिव श्याम जाधवर, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. गिरीश कुलकर्णी तसेच संजय देवडा, डॉ. सचिन पवार, धर्मेंद्र शहा, अरविंद शिंदे, संजय घुले, संजय सावंत, रवी नरहिरे, डॉ. निळकंठ चोपणे, डॉ. रामकृष्ण लोंढे, डॉ. सुयोग काकानी, निखिल भडंगे, लक्ष्मीकांत भुतडा, अभिजीत भिसे, दत्तात्रय टोणगे, सत्येन शेळके या रोटरी सदस्यांनी हा उपक्रम यशस्वी केला.

### एकूण १८ शाळांवर उपक्रम

कळंब शहर आणि परिसरातील एकूण १८ शाळांवर हा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये विद्याभवन हायस्कूल, सावित्रीबाई फुले विद्यालय, ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, छ.शिवाजी महाविद्यालय, जनजागृती माध्यमिक विद्यालय, नगरपरिषद शाळा, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, जिल्हा परिषद प्रशाला, सोफिया उर्दू हायस्कूल, सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळा, लता मंगेशकर प्राथमिक शाळा, भगतसिंग विद्यालय, मॉडेल इंग्लिश स्कूल, केंब्रिज इंग्लिश स्कूल, बोधले विद्यालय डिकसळ, शारदा इंग्लिश स्कूल, कॅनव्हास इंग्लिश स्कूल, आदर्श इंग्लिश स्कूल या शाळांचा समावेश होता.


### १८ शाळांमध्ये जाऊन सत्कार

शिक्षक दिनाचे औचित्य साधत रोटरी क्लबच्या सर्व सदस्यांनी एकत्र येऊन वेगवेळ्या ४ टीम बनवल्या आणि एकाच दिवशी या सर्व १८ शाळांमध्ये जाऊन ४५० शिक्षकांचा गुलाब पुष्प आणि पेन देऊन सत्कार केला.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भटके विमुक्त दिन उत्साहात साजरा

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा शहरातील श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात भटके विमुक्त दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले हे होते. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आपली संस्कृती, रीती, परंपरा यांचे जतन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा व वारली चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. रांगोळी स्पर्धेत प्रथम पारितोषिक सानिका राठोड, द्वितीय पारितोषिक सुहासिनी घोडके, तृतीय पारितोषिक करीना सास्तुरे यांनी मिळविले. तसेच चित्रकला स्पर्धेत प्रथम पारितोषिक श्रीपाद तळीखेडे, द्वितीय पारितोषिक




सृष्टी चापाले, तृतीय पारितोषिक निकीता चव्हाण यांनी मिळविले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून कु. शुभदा पाठक व श्रीमती सूर्यवंशी सी. एन. यांनी केले. विद्यार्थी जीवनामध्ये विद्यार्थ्यांनी एक तरी कला जोपसावी असे आवाहन करून विद्यार्थ्यांना त्या संदर्भाने शुभदा पाठक यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक प्रा. महामुनी एस.ए., कला शाखेचे प्रभारी प्रा. लोभे डी. बी. प्रा.श्रीमती निचत मॅडम, प्रा.श्रीमती लोकरे मॅडम,प्रा. कुंभार एस.ए.,प्रा. पांढरे डी.डी.,प्रा. चव्हाण पी.आर., प्रा. एम.एस. जाधव, प्रा. ए.आर. येणेगुरकरकर, प्रा.गुरव एस.आर. हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमती क्रांती इंगोले व प्रास्ताविक प्रा. ज्योती जोगदाबके यांनी केले तर आभार प्रा. श्रीमती मोरे मॅडम यांनी मानले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
आपलं धाराशिव
रविवार, दि. 7 सप्टेंबर 2025

# कुटुंब एकसंघ ठेवणे हेच प्रत्येकाचे नैतिक कर्तव्यः सिने अभिनेत्री अलका कुबल यांचे मत

## मुरुम येथील रोटरी क्लब ऑफ मुरूम सिटीचा शिक्षक दिनानिमित्त भव्य उपक्रम

आरंभ मराठी | मुरुम

मुलांना संस्कारयुक्त बनविताना पालकांनी स्वतः ज्येष्ठांचा आदर, निस्वार्थ सेवाभाव व कष्टमय परंपरा जपून मुलांना त्याची जाणीव करून द्यावी. समाजात आपले कुटुंब अधिक सुसंस्कारित व एकसंघ ठेवणे हा प्रत्येकाचा नैतिक आदर्श आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल यांनी केले. रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून रत्नमाला मंगल कार्यालयात शुक्रवारी (ता. ५) आयोजित शिक्षक गौरव सोहळ्यात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीराम कुलकर्णी होते. तर रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी व सचिव कल्लाप्पा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. या सोहळ्यात अनुसया मिरकले, वैभव वेल्हाळ, संगीता माकणे, तनुजा गाढवे, दत्ता राठोड, प्रिया वाकडे, योगेश कोडलंगरे, जाफरसाहेब मुल्ला, मुकेश सोमवंशी, उल्हास घुरघुरे, शंकर आसबे, प्रा. डॉ. अरुण बावा आदी मान्यवर शिक्षकांना अलका कुबल यांच्या हस्ते ''रोटरी नेशन बिल्डर अवॉर्ड'' देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच गौरी आरास सजावट स्पर्धेत कविता जाधव (प्रथम रोख ₹ २००१), शिल्पा पांचाळ (द्वितीय रोख ₹ १५०१), मित्रवंदा जाधव (तृतीय रोख ₹ १००१) यांना सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. विशेष आकर्षक सादरीकरणासाठी अंजली सूर्यवंशी, स्वाती जाधव, ललिता जाधव, साक्षी महामुनी, वैशाली पोतदार, अपर्णा पोतदार आदींना पारितोषिके देण्यात आली. तसेच डॉ. महेश स्वामी




यांचा वाढदिवसानिमित्त विशेष सत्कार अलका कुबल यांच्या हस्ते झाला. अध्यक्षीय समारोपात बोलताना श्रीराम कुलकर्णी म्हणाले, समाजासाठी मोलाची सेवा करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान हा अभिमानाचा क्षण आहे. रोटरीसारख्या जागतिक सेवाभावी संस्थेकडून होत असलेला हा उपक्रम स्तुत्य आहे.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले. संतोष कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर आभार कल्लाप्पा पाटील यांनी मानले. शहर व परिसरातील मान्यवर, पदाधिकारी, नागरिक, विद्यार्थीविद्यार्थिनींच्या मोठ्या उपस्थितीत झालेला हा सोहळा संस्कार, समाजसेवा व शिक्षकांचा गौरव यांचा अनोखा संगम ठरला.

## विविध वृत्त

### काटीचे सुपुत्र संतोष साळुंके यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर तालुक्यातील काटीचे सुपुत्र व सध्या उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथे केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत असलेले संतोष भगवानराव साळुंके यांना बसवेश्वर विचार मंच, सोलापूर तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.साळुंके यांनी जि.प. शाळा मार्डीला माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत प्रथम क्रमांक, जि.प. शाळा तीर्थला आयएसओ मानांकन, जि.प. शाळा सिंदखेड डिजिटल शाळा अशा उपक्रमांद्वारे शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. यापूर्वीही त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.
या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदनहोतआहे.

### तुळजापूर शहरातील प्रतिक्षा नगर भारुड कार्यक्रम



आरंभ मराठी | तुळजापूर

शहरातील प्रतीक्षा नगर येथे श्री कृष्णा गणेश मंडळ यांच्या वतीने भारुड हा कार्यक्रम घेण्यात आला. आजच्या इंस्टाग्राम फेसबुक च्या युगामध्ये पारंपारिक सांप्रदायिक आजच्या युगाला माहित नसलेल्या म्हणजे भारुड हा कार्यक्रम प्रतीक्षा नगर येथे घेण्यात आला. ह्या कार्यक्रमाला ह भ प प्रशांत कापसे महाराज यांनी हा कार्यक्रम सादर केला . या कार्यक्रमाला महिला भजनी मंडळ उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष शिवरत्न मोटे , श्रेयस जाधव, अभिजीत पाटील, पियुष खांडेकर, ज्येष्ठ सदस्य गणेश बागल, दत्तात्रय वाघमोडे, बिबीशन लाटे, धनु जाधव, विद्यासागर लोखंडे, तुकाराम मोटे, आदेश खांडेकर, गजानन कांबळे, राजकुमार जायभा, सोनू यादव, या कार्यक्रमास महिलांचा सहभाग मोठा होता मंडळाच्या वतीने अन्नदानाचा कार्यक्रम पण घेतला गेला यावर्षी राजा शिवछत्रपती क्रिकेट क्लब च्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात येणार आहे.सर्व सामाजिक उपक्रम हे मंडळ राबवत असतो.

### तुळजापूर शहरातील गणपती विसर्जन जल्लोषात

आरंभ मराठी | तुळजापूर



दहा दिवस मुक्काम केलेल्या गणरास तुळजापूरात गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या च्या जयघोषात निरोप देण्यात आला. गणपती विसर्जनासाठी नगरपरिषद कार्यालय तुळजापूर यांच्या वतीने गणपती विसर्जनासाठी हंगारगा तलाव येथे क्रेनची व गणपती उचलण्यासाठी पाट्याचे नियोजन करण्यात आले होते. दुपारी बारा वाजल्यापासून क्रेन लावून गणपती मूर्तीची पूजा करून विसर्जनाची सुरुवात झाली.

### तुळजापूरमध्ये सिंधी ताडी जप्त

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील नवीन बसस्थानक समोरील भोसले खडी क्रशर पॉईंटच्या बाजूला तुळजापूर पोलीसांनी तपासणी केली. या कारवाईत प्रकाश सतिष जेटीथोर (वय ३२) यांच्या ताब्यात अंदाजे २,००० रुपये किंमतीची १०० लिटर सिंधी ताडी जप्त करण्यात आली. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### धाराशिव शहर पोलिसांकडून देशी-विदेशी दारु जप्ती

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव- शहरातील बौध्दनगर हॉटेल शिवा समोर पोलिसांच्या तपासणी दरम्यान सुरज उर्फ अमर आनंद विधाते यांच्याकडून अंदाजे ५,८६० रुपये किंमतीच्या ५७ सिलबंद बाटल्या देशी आणि विदेशी दारु जप्त करण्यात आल्या. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### अंबी पोलीस ठाण्याची जुगार विरोधी कारवाई; कल्याण मटका साहित्य जप्त

आरंभ मराठी |परंडा

अंबी पोलीसांनी हॉटेल सागरच्या पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकला. या कारवाईत पिनु केरबा वडेकर (वय ३६) यांच्याकडे कल्याण मटका जुगार साहित्य (किंमत १,३६० रुपये) आढळले आणि जप्त करण्यात आले. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### रहदारी उल्लंघनाविरोधी कारवाई

आरंभ मराठी | लोहारा

लोहारा चौक येथे दुपारी १५.२० वाजता तानाजी किसन जाधव (वय ३८) यांनी आपले वाहन (क्र. एमएच २५ एम ०६६०) धोकादायकरीत्या उभे केले होते. पोलीसांनी या प्रकरणी भारतीय दंडसंहिता कलम २८५ अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

### वाशी पोलीस ठाण्याची रस्ता अपघात कारवाई

**वाशी;** शिवाजी सदाशिव गायकवाड (वय ५२) हे पार्डी फाटा येथे रोडलगत थांबले असताना टेम्पो (क्र. एमएच ४२ एआर ५१५४) चालवणारा बालाजी अजिनाथ मोरे यांनी धडक दिली. अपघातात गायकवाड यांचा मृत्यू झाला. आरोपी वाहनासह पसार झाला. भा.न्या.सं. कलम २८१, १०६(१), १८४, १३४(अ)(ब) मोवाका अंतर्गत गुन्हानोंदविला.

### पेरणी यंत्र चोरी

**भूम:** उमेश श्रीराम कराळे (वय २३) यांच्या भुमी ॲग्रो कंपनीचे जुने पेरणी यंत्र चोरी झाले. पोलीसांनी भा.न्या.सं. कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदविला.

### तुळजापूर मोटरसायकल चोरी

**तुळजापूर:**प्रभाकर रमेश कोळी (वय ३४) यांची अंदाजे २५,००० रुपये किंमतीची हिरो उच डीएलक्स मोटरसायकल (क्र. एमएच २५ ए.ए. ५२६२) चोरी झाली. पोलीसांनी भा.न्या.सं. कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदविला.

## पोलीस हवालदार दीपक लाव्हरे-पाटील यांचा विविध मान्यवरांकडून गौरव



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरात पोलीस हवालदार दिपक महादेव लाव्हरे-पाटील (भरोसा सेलमहिला छेडछाड विरोधी पथक) यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांचा स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला.तसेच पोलीस विभागाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. लाव्हरे- पाटील यांनी हरवलेल्या दोन बालकांना सुखरूप त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याची कामगिरी केली. तसेच शहरातील शाळा, कॉलेज, क्लासेस व सार्वजनिक ठिकाणी छेडछाड करणारे, दादागिरी करणारे तसेच कर्णकर्कश हॉर्नमुळे शांतता भंग करणाऱ्या टवाळखोरांवर योग्य ती कारवाई करून शहरात शांतता राखली.

याशिवाय विद्यार्थ्यांना कायदेविषयक माहिती, स्पर्धा परीक्षा, पोलीस व आर्मी भरती, तसेच क्रीडा क्षेत्राबाबत मार्गदर्शन करून त्यांना वाईट प्रवृत्तींपासून दूर ठेवण्याचे मोलाचे कार्यही त्यांनी केले. त्यांच्या या उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री व धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनी त्यांचा सत्कार झाला. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक शफकत आमना यांनीही प्रशंसापत्र देवून गौरव केला.

याशिवाय श्रीपतराव भोसले हायस्कूल आणि विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांनीही मानपत्र देवून लाव्हरे-पाटील यांचा यथोचित गौरव केला. अलीकडेच फिट इंडिया सायकल मॅरेथॉनचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल पोलिस अधीक्षक शफकत आमना, सोलापूर जिल्हाधिकारी, सोलापूरचे अप्पर पोलिस अधीक्षक व मैनक घोष यांच्या हस्तेही त्यांचा सत्कार करण्यात आला. शहरातील नागरिक, व्यापारी, विद्यार्थी व पालक मंडळींनी लाव्हरे-पाटील यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे कार्य शहरासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

## पीएमश्री जि.प. उर्दू शाळा तेरच्या शेख मौला यांना आदर्श शिक्षक पुरस्कार,तर शाळेस मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा पुरस्कार प्रदान

आरंभ मराठी | तेर

गटशिक्षण कार्यालय धाराशिव च्या वतीने दिला जाणारा २०२४ .२५ चा तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू शाळा तेर येथील शिक्षक शेख मौला इस्माईलसाब यांना प्रदान करण्यात आला. तर मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा हा तालुकास्तरीय तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार ही या शाळेस मिळाला आहे ५सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी संतोष नलावडे होते तर प्रमुख पाहुणे



म्हणून खासदार ओमराजे निंबाळकर शिक्षक आमदार विक्रम काळे कळंब-धाराशिवचे आमदार कैलास पाटील लाभले होते. मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षकांना शाल, पुष्पगुच्छ, सन्मान चिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले सदर पुरस्काराबद्दल मुख्याध्यापक तय्यबअली शहा यांनी अभिनंदन केले आहे. याच शाळेस मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा धाराशिव तालुका तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. कार्यक्रमाचे आयोजन गटशिक्षणाधिकारी सय्यद इसरार अहमद यांनी केले होते

## अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष अजित कुमार मोहंतींनी सहकुटुंब घेतले तुळजाभवानी देवींचे दर्शन

आरंभ मराठी | तुळजापूर

देशातील अणुऊर्जा क्षेत्रातील प्रमुख वैज्ञानिक, अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष तसेच भाभा अणुसंशोधन केंद्राचे माजी संचालक अजित कुमार मोहंती यांनी आज सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवी यांच्या मंदिरात दर्शन घेतले.मोहंती कुटुंबीयांनी देवींची ओटी भरून कुलधर्म आणि कुलाचार पार पाडले. त्यानंतर आरतीत सहभागी होऊन त्यांनी मनोभावे देवींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर मंदिर संस्थानच्या वतीने श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा आणि महावस्त्र भेट देऊन अजित कुमार मोहंती यांचा



सन्मान करण्यात आला.या वेळी सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर, जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, सुरक्षा निरीक्षक विक्रम कदम, सहायक सुरक्षा निरीक्षक दीपक शेळके तसेच मंदिर संस्थानचे इतर कर्मचारी उपस्थित होते. ओडिशा येथील मूळ रहिवासी असलेले अजित कुमार मोहंती हे देशाच्या अणुऊर्जा क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तिमत्त्व असून भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक म्हणून त्यांनी विविध महत्त्वपूर्ण प्रकल्प यशस्वीपणे हाताळले आहेत

## आरंभ मराठी माजी नगरसेवक ढोबळे यांचा विश्वास, सह्याद्री अंकुर शिशु गृहाला भेट

# अनाथ बाळांना समाज उघड्यावर पडू देणार नाही

आरंभ मराठी | धाराशिव

आईच्या कुशीत विसावण्याचे भाग्य न मिळालेल्या आणि वडिलांच्या हाताचा आधार हरवलेल्या लहानग्यांचे आयुष्य किती वेदनादायी असते, हे पाहून कोणाच्याही हृदयाला चटका लागतो. अशाच निराधार, निरागस बाळांना आधार देणाऱ्या अंकुर शिशुगृहास माजी नगरसेवक अक्षय ढोबळे यांनी सहकुटुंब भेट दिली.त्या लहानशा देव दूतांना पाहताच वातावरण भावनिक झाले. त्यांच्या निरागस डोळ्यांतून वाहणारे अश्रू, त्यांचे मूक हसू आणि आधाराच्या शोधात पुढे केलेले लहान हात पाहून ढोबळे यांच्या डोळ्यां तही पाणी आले. क्षणभर ते स्वतःला सावरू शकले नाहीत.




अश्रूंमधून उमटलेले शब्द याप्रसंगी त्यांनी संस्थेसाठी धनादेश सुपूर्द केला आणि भावनिक शब्दांत म्हणाले, या बाळांचे आई-वडील झाले नाहीत तर काय झाले, आपण सारे समाजच त्यांचे आई-वडील आहोत. पुढील काळात माझ्यातर्फे या संस्थेसाठी आणि या लहानग्यांसाठी भरपूर मदत केली जाईल. ही माझी जबाबदारी आहे.संस्थेच्या वतीने ढोबळे परीवाराचे स्वागत करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले, प्रत्येक जणाने एकदा तरी या शिशुगृहाला भेट द्यावी. ही निरागस बाळं तुमच्याकडे फक्त मदतीची नव्हे, तर मायेमुळे भरलेल्या नजरेने पाहतात.माजी नगरसेवक अक्षय ढोबळे यांचा मदतीचा संकल्प हा फक्त अनाथ बाळांसाठी आशेचा किरण नाही, तर संपूर्ण समाजासाठी एक जागृती आहे. या वेळी उपस्थित मान्यवरांमध्ये सो. ढोबळे मॅडम, फेरोज पल्ला, शोहेब शेख, किरण मॅडम, जिजाबाई जाधव, रिंकू घोडके यांचा समावेश होता. सर्वांनी या भेटीचे कौतुक करत संस्थेच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

## ढोल ताशाच्या गजरात स्वामी विवेकानंद विद्यामंदिर गणपतीचे उत्साहात विसर्जन

**उमरगा :**येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने बसवण्यात आलेल्या गणपती बाप्पाचे विसर्जन ढोल ताशा व लेझीमच्या निनादात अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात पार पाडण्यात आला. दोन्ही शाळेच्या संयुक्ता विद्यमाने बसवण्यात आलेल्या गणरायाचे विसर्जन ढोल ताशा, लेझीम, लाटी काठी,नियुध्द, टिपरी,झांज पथक आदी प्रकार अत्यंत आकर्षक पद्धतीने सादर करून उमरगेकरांची मनी जिंकली. या प्रकारात शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते. संस्थेचे कार्यवाह डॉ.कपिल महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंद शाळेपासून उमरग्यातील प्रमुख मार्गावरून विसर्जनाची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. शेवटी धनवंतरी हॉस्पिटल समोर श्री गणरायाची संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन,संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे ,डॉ. शुभांगीनी महाजन, रजनीताई महाजन यांच्या हस्ते गणपतीची आरती करण्यात आली व विसर्जन करण्यात आले. मिरवणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी मुख्याध्यापिका सविता लोहार, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, गोपाळ आष्टे ,संजय कोथळीकर आदीसह सर्व शिक्षकांनी कष्ट घेतले. यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रत्येक पथक आकर्षक रंगाचे पेहराव करून व वेगवेगळ्या वेशभूषा करून मिरवणुकीत सहभाग नोंदवला.